# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०६/०९/२०२४

## प्रेसनोट

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे, दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. संदर्भ क्र.०२ मधील सुचनानुसार या कार्यक्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मनपा क्षेत्रातील सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या मनपा/प्राथमिक/माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांचे मुख्याध्यापक तसेच शाळा संस्थांचे प्रतिनिधी यांचे बैठकीचे आयोजन शिक्षण विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांचे मार्फत दि. ०४.०९.२०२४ रोजी, ठिक १२.०० वा. उल्हासनगर महानगरपालिका सभागृह हॉल पहिला मजला उल्हासनगर–३ येथे करण्यात आली होती. सदर बैठकिस डॉ.सुभाष जाधव मा.उपायुक्त (शिक्षण)मनपा, श्री. दिपक धनगर, प्रशासन अधिकारी, श्रीम. डॉ.मोहिनी धर्मा, वैद्याकिय अधिकरी, श्रीम. निलम कदम उपलेखाधिकारी शिक्षण विभाग, श्रीम. छाया प्रकाश डांगळे, जनसंपर्क अधिकारी, श्री. मनिष हिवरे, सार्वजनिक आरोग्य अधिकारी, श्री. नितेश रंगारी, विभाग प्रमुख, महिला व बाल कल्याण विभाग, हे उपस्थित होते. तसेच मनपा क्षेत्रातील मनपा शाळांचे मुख्याध्यापक तसचे खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व संस्थाचालक उपस्थित होते.

सदर बैठकीत डॉ.सुभाष जाधव मा.उपायुक्त (शिक्षण) उल्हासनगर महानगरपालिका यांनी सर्व उपस्थित शाळांचे मुख्याध्यापक व शाळा संस्थांचे प्रतिनिधी यांना दि. २१ ऑगस्ट, २०२४ चे शासन निर्णयात नमूद विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या सुरक्षाविषयक, शाळा परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व तक्रार पेटी बसविणे, शाळेत कार्यारत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांचे चारित्र्य पडताळणी तात्काळ करून घेणे शाळेत लहान सहा वर्षापर्यतच्या बालकांसाठी महिला कर्मचारी यांची नियुक्ती करणे, शाळांत सखी सावित्री समिती तसेच सुरक्षा समिती गठीत करणेबाबत मार्गदर्शन केले. तद्नंतर श्री.दिपक धनगर, प्रशासन अधिकारी यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे घोषित केले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका